(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**के. कृष्णमाचार्युलु आणि इतर**
**विरुद्ध**
**श्री वेंकटेश्वर हिंदू अभियांत्रिकी महाविद्यालय आणि अन्य**
**२१ फेब्रुवारी ,१९९७**
**[ न्यायमूर्ती- के. रामास्वामी आणि एस . सगीर अहमद ]**

**सेवाविषयक विधी:**

खाजगी महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारीवर्ग-प्रयोगशाळा सहाय्यक-दैनंदिन वेतनावर नियुक्त- इतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने समान कामासाठी समान वेतनाचा दावा-उच्च न्यायालयासमोर रिट याचिका- राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (डी) अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने त्यांना समान वेतन मिळण्याचा हक्क आहे.

**भारतीय राज्यघटना, १९५०:**

अनुच्छेद ३९ (डी) आणि २२६-समान कामासाठी समान वेतन-खाजगी महाविद्यालयातील शिक्षक ज्यांना सहायक अनुदान मिळत नाही, त्यांना अनुच्छेद २२६ अंतर्गत उपाय करून सरकारने जारी केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे-रिट याचिका टिकण्यायोग्य आहे- त्यांना अनुच्छेद ३९ (डी) अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने समान वेतन मिळण्याचा अधिकार आहे.

**दिवाणी अपील न्यायाधिकार क्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक १७७४/१९९७**

आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या रिट अर्ज (W.A.) क्रमांक १७९/१९९६ मधील दिनांक २३. ४. ९६ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्याची बाजू एल. एन. राव, व्ही. एस. रेड्डी आणि एस. यू. के. सागर. यांनी मांडली.

उत्तरवादींची बाजू बी. पार्थसारथी यांनी मांडली.

न्यायालयाने खालील आदेश दिला :

ही विशेष अनुमतीद्वारे याचिका आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने रिट अर्ज (W.A.) क्रमांक १७९/१९९६ मधील दिनांक २३ एप्रिल १९९६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयावरून उद्भवली आहे.

अपीलकर्ता आणि इतर सहा जणांची दैनंदिन वेतनावर प्रयोगशाळा सहाय्यकच्या पदावर शिक्षकेतर कर्मचारीवर्ग म्हणून उत्तरवादीच्या खाजगी महाविद्यालयात नियुक्ती करण्यात आली होती, ही मान्य केलेली स्थिती आहे. त्यांना दैनंदिन वेतन दिले जात होते. समान वेतनाची मागणी करणारी रिट याचिका आणि अपील फेटाळण्यात आल्याने, त्यांनी इतर सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने समान कामासाठी समान वेतन देण्याच्या निर्देशासाठी सध्याचे अपील दाखल केले आहे.

सरकारने जारी केलेल्या कार्यकारी सूचनांनी त्यांना सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने वेतनमानाचा दावा करण्याचा अधिकार दिला आहे यात वाद नाही. प्रश्न असा आहेः जेव्हा त्या संदर्भात कोणताही वैधानिक नियम जारी केला जात नसेल आणि संबंधित वेळी संस्थेला कोणतेही सहाय्य अनुदान मिळत नसेल; तेव्हा संविधानाच्या अनुच्छेद २२६ अंतर्गत रिट याचिका टिकण्यायोग्य नाही का? या न्यायालयाच्या निर्णयांच्या प्रदीर्घ रांगा लक्षात घेता, नागरिकांचा मुलभूत हक्क असलेल्या शिक्षणासाठी जेव्हा एखाद्या संस्थेमध्ये शासनाकडून स्वारस्य निर्माण केले जाते, तेव्हा शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना त्यांची कर्तव्ये पार पाडताना लोकहित घटक मिळतो. परिणामी, लोकहित घटकासाठी सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच त्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटींचे नियमन करणे आवश्यक आहे. परिणामी, त्यांनाही शासनाच्या कार्यकारी निर्देशानुसार वेतनश्रेणीच्या समानतेचा अधिकार नाही का? अपीलकर्त्यासह रिट याचिका दाखल केलेल्या सर्व व्यक्तींनी नंतर रिट याचिकेतून माघार घेतली आणि त्यानंतर उत्तरवादी व्यवस्थापनाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने वेतन दिले हे देखील वादातीत नाही. अपीलकर्ते न्यायालयीन दबावातून त्यांच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा आग्रह धरत असल्याने, त्यांना कायद्याचे संरक्षण आवश्यक आहे.लोकांना शिक्षणाच्या अधिकाराचा लाभ घेण्यासाठी सुविधा आणि संधी उपलब्ध करून देणे हे राज्याचे कर्तव्य आहे असे आमचे मत आहे.  खासगी

संस्था शैक्षणिक संधींच्या गरजा पूर्ण करतात.खाजगी संस्थेतील एखाद्या पदावर नियुक्त झालेल्या शिक्षकालाही सरकारने जारी केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे. कोणत्या मंचासमोर दाद मागावी हा प्रश्न आहे. औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत हा उपाय उपलब्ध असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. जेव्हा लोकहिताचा घटक तयार केला जातो आणि संस्था त्या घटकाची पूर्तता करत असते, तेव्हा शिक्षक, संस्थेची शाखा देखील अनुच्छेद २२६ अंतर्गत प्रदान केलेल्या उपायाचा लाभ घेण्यास पात्र असते; अधिकारक्षेत्राचा भाग खूप व्यापक असतो.जर उपाय हा खाजगी कायदेशीर उपाय असेल तर त्याची स्थिती वेगळी असेल.त्यामुळे इतरांना मिळणारा लाभ त्यांना नाकारता येणार नाही. त्यानुसार, आम्ही असे मानतो की रिट याचिका टिकण्यायोग्य आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३९ (डी) अंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने त्यांना समान वेतन मिळण्याचा हक्क आहे.

सबब, अपील मान्य करण्यात येते. रिट जारी केली जाते. परिस्थिती पाहता खर्चाबद्दल कोणतेही आदेश नाही.

आर. पी. (R. P. ) अपील मान्य करण्यात आले.

****

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****